# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**
**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१.**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट १८-२३** **दिनांक १७/०१/२०२३**

## इलेक्ट्रीसिटी बिलाची फसवणूक झालेली रक्कम रुपये २६,०००/- परत मिळविण्यात नालासोपारा पोलीस ठाण्यास यश.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय अंतर्गत नालासोपारा परीसरातील ए /१०४ इंद्रप्रस्थ, एस टी स्टॅण्ड रोड, नालासोपारा प. ता- वसई,जि- पालघर येथे राहणारे श्री. किरण शिवराम काळसेकर यांना दिनांक ०६/०१/२०२३ रोजी १०.०० वाजताच्या सुमारास त्यांचे मोबाईलवर एक अनोळखी इसम एम. एस. ई. बी. मधुन बोलत असल्याचे भासवून तुमचे राहते रुमचे विजेचे बिल भरणे बाकी आहे ते न भरल्यास विज पुरवठा खंडीत होईल व सदर विजपुरवठा चालू ठेवण्याकरीता तात्काळ ऑनलाईन बिल भरा असे सांगुन तक्रारदार यांना एक लिंक पाठविली. सदरची लिंक तक्रारदार यांनी ओपन केली असता त्यावर **TeamViewer** हया ॲपलिकेशनद्वारे अनोळखी इसमाने तक्रारदार यांचे बँक खाते मधुन सुरुवातीला २६,०००/- रुपये त्यानंतर लगेचच ८,३००/- रुपये वळते केले. तक्रारदार यांचे अकाऊटमधुन एकुण ३४,३००/- रुपये डेबिट केले असल्याचा मेसेज तक्रारदार यांना प्राप्त झाल्याने तक्रारदार यांनी लागलीच नालासोपारा पोलीस ठाणे येथे तक्रारी अर्ज दाखल केला.

नमूद तक्रारीबाबत पोलीस निरीक्षक राहुल सोनवणे व परिविक्षाधिन पोलीस उपनिरीक्षक/ योगेश मोरे यांनी तात्काळ दखल घेवून तक्रारदार यांचे झाले व्यवहाराबाबत माहिती प्राप्त केली. तक्रारदार यांची फसवणूक रक्कम हि प्रथम **PAY U** व **LUDO KING** या ऑनलाईन पेमेंट गेटवेवर गेल्याचे चौकशीमध्ये निष्पन्न झाले. त्याबाबत लागलीच **PAY U** व **LUDO KING** चे नोडल अधिकारी यांचेशी संपर्क करुन सदरचे पैसे तात्काळ डेबिट फ्रिज करुन तक्रारदार यांचे अकाऊंटवर पैसे वळविण्याबाबत नमुद **PAY U** व **LUDO KING** नोडल अधिकारी यांना ई मेल करण्यात आला होता. त्यापैकी **PAY U** चे नोडल अधिकारी यांनी तक्रारदार यांची फसवणुक झालेले रक्कमेबाबत पडताळणी करुन तक्रारदार यांची फसवणुक झालेली २६,०००/- रुपये फ्रिज करुन तक्रारदार यांचे मुळ खात्यावर परत पाठविले आहे.

**अशा प्रकारची फसवणूक टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी...**

- अशा प्रकारे फसवे कॉल अथवा एसएसएस प्राप्त झाल्यास त्यावर कोणताही प्रतिसाद देवू नये.
- आपल्या मोबाईल क्रमांकावर प्राप्त होणारे एसएमएस, ईमेल,कॉल्स यांची विश्वासहर्ता ची पडताळणी करावी.
- आपले मोबाईलवर प्राप्त होणारा **OTP** किंवा आपली वैयक्तीक माहिती देवू नये.
- तसेच फसवणुक झाल्याचे लक्षात येताच लागलीच नजीकच्या पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा जेणेकरुन **Golden Hour Period** मध्ये फसवणुक झालेली रक्कम परत मिळविण्याकरीता मदत होईल.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नागरिकांना आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारची फसवणूक झाल्याचे आढळुन आल्यास तात्काळ नजीकच्या पोलीस ठाणेस, तसेच सायबर गुन्हे कक्षास संपर्क साधावा. तसेच www.cybercrime.gov.in अथवा १९३० या हेल्पलाईनवर संपर्क साधून तक्रार द्यावी.

- ➢ **नालासोपारा पोलीस ठाणे शाखा संपर्क क्रमांक :- ८६६९६०४०२७**
- ➢ **नालासोपारा पोलीस ठाणे ई-मेल आयडी :- pi.nalasopara.mb- vv@mahapolice .gov.in**

सदरची कामगिरी श्री. सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त परिमंडळ ३, विरार अति. कार्यभार परिमंडळ २ वसई, श्री. चंद्रकांत जाधव , सहा. पोलीस आयुक्त नालासोपारा विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. विलास सुपे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, नालासोपारा पोलीस ठाणे, श्री. राहुल सोनवणे पोलीस निरीक्षक (गुन्हे), परिविक्षाधिन पोलीस उपनिरीक्षक योगेश मोरे यांनी पार पाडली आहे.

------oooo------